2019 - 20

Issue : XIX, Vol . II
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2229-4406
Sept. 2019 To Feb. 2020



9

# कुटुंबव्यवस्थेतील आधुनिक जीवनशैली व परिस्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास

*डॉ. विलास भगवानराव भिल्लारे*
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
नगवगण शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड

Research Paper - Sociology

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून कुटुंबसंस्था प्रचलित आहे. मानवाचे सामाजिक जीवन हे **कुटुंब संस्था** याद्वारे प्रगट होत असते. भारतात आदर्श कुटुंबव्यवस्था आहे. कुटुंबातील नाते संबध एक सांस्कृतिक केंद्र आहे. जन्म व मृत्यु, सुख-दुःखा च्या ऋणात्मक संबधाचे जीवन जगण्याची शक्ती ही याच व्यवस्थेत मिळते. सर्वांगीन जीवनाचा विकास घडविण्यास जन्मापासून ते मृत्यू पर्यंत जी अनेक स्थित्यंतरे झाली असली तरी भारतीय कुटुंब संस्था अजुनही आदर्श आहे. व ती टिकून राहील, टिकेल व टिकणार आहे याचे आदर्श भारतीय अध्यात्मिक व वैज्ञानीक युगातही भारत हे एक शांततामय व चैतन्यशक्तीचे ज्वलंत उदाहरण कुटुंब संस्थेतच आढळते.

कुटुंबामध्ये आई-वडील त्यांची मुले, बहीण-भाऊ, नातेवाईक राहतात. विवाह हा एक धार्मिक व पवित्र संस्कार आहेत. या कल्पनेमुळे कुटुंब संस्थेला आदर्शात्मक स्वरुप लाभते. कुटुंब हा एक प्राथमिक गट आहे. लैगिंक संबध, प्रजोत्पादन, वात्सल्य, वंश संरक्षण, पती-पत्नी प्रेम, कुटुंबाचा अभिमान सुख-दुःख, आनंद, रक्षण, संस्कार, रुढी, परंपरा, आचार-विचार, सामाजिक स्थैर्याची उत्कट इच्छा, सामाजीकरण, जगण्याची प्रेरणा, समाजाचे कल्याण म्हणजेच कुटुंबाचे कल्याण होय. कुटुंबाचे कल्याण हे साधन नसून साध्य आहे.

भारतीय समाजशास्त्राच्या व मानसशास्त्राच्या दृष्टिकोणातून कुटुंबसंस्था एक आदर्श संस्था आहे. मॅक आयव्हर हा शास्त्रज्ञ म्हणतो **कुटुंब म्हणजे असा एक प्राथमिक गट आहे की, जो लैंगिक संबधावर आधारीत असून प्रजोत्पादन व बालसंगोपन करण्यास सिध्द असतो.**

**Family** हा शब्द **Famalus** या लॅटिन शब्दापासून तयार झाला. एल्मर यांनी आपल्या **Sociology of family** या पुस्तकात **Family** या शब्दाची उत्पत्ती दिली आहे. हा शब्द मानवी समुहाकडे निर्देश करतो. भारतात संयुक्त किंवा एकत्र कुटुंब पध्दती पौर्वात्य देशात देशप्रामुख्याने

कृषी प्रधान आहे. आणि अशा कृषी प्रदान देशात संयुक्त कुटुंब पध्दती आढळते. पाश्चिमात्य देशात ही पध्दती आढळत नाही. या एकत्र कुटुंब पध्दतीचा विचार करतांना एकदम **भारतीय कुटुंबाचे आदर्श** जगासमोर आढळते. संयुक्त कुटुंब पध्दती हे भारतीय संस्कृतीचे प्रमुख वैशिष्टय म्हणून ही कुटुंब संस्था आपल्याकडे प्रचलित आहे. डॉ. ईरावतीबाई कर्वे म्हणतात **संयुक्त कुटुंब म्हणजे अशा व्यक्तींचा समुह ज्या एका घरात राहतात ज्यात सर्व व्यक्ती एकाच चुलीवर शिजलेले अन्न ग्रहण करतात त्याची संपत्ती सामायिक असते आणि जे समान धार्मिक कार्यात सहभागी असून त्यांचा परस्परांशी काही नाते संबध असतो.** उदा. भारतात जगातील सर्वात मोठे कुटुंब व आदर्श कुटुंब म्हणून मिझोराम येथील आदर्श कुटुंबाचे उदाहरण देता येईल.

थोडक्यात कुटुंबाचा आकार बदलला परस्थिती बदलली असली तरी भारतात एकत्र कुटुंब पध्दती अजिबात नष्ट होईल असे वाटत नाही. असे मत डॉ. दामले यांनी मुंबई शहराची पाहणी करुन काढलेल्या अनुमानावरुन व्यक्त केले. एकत्र कुटुंबाची जागा विभक्त कुटुंब पध्दतीने घेतली असली तरी कुटुंबाची नाळ आधुनिक जीवन शैलीत बदलत्या वैज्ञानिक युगातही टिकून रहाते ती तुटणे शक्यच नाही. हेच आदर्श संस्कारातील मूल्य आहे.

२१ व्या शतकात ही कुटुंब एक घागर में सागर में सागर और बिंदू में सिंधू महान असलेचे दिसते. विश्वची माझे घर व सुधैव कुटुंबकम हे संताचे बोल सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, धर्म निरंपेक्षता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता, बधुत्व व सामाजिक सृजनशिलताची जाणीव करुन देते. समाजशास्त्र व जैव शास्त्रियदृष्टया, मानसिक प्रवृत्ती व सामाजिक संरचनेत होत असलेले बदलांचा व आधुनिक जीवनशैलीत रक्तसंबंध व आत्मसंबंध संघटनदृढ होते. ते आप्तसंबध तीन प्रकारचे आहेत.१) आई - वडील त्यांची मुले संबध (कुटुंब) २) पति-पत्नी त्यांचे संबध (विवाह) सहोदरातील सख्खे भावंडे संबंध (आप्तसंबध) मुरडॉक या समाजशास्त्रज्ञाने प्राथमिक कुटुंबात ८ प्रकारचे संबंध दुय्यम संबंधात ३३प्रकारचे संबंध येतात व तृतीयाक १५१ संबंध येतात. इंटरनॅशनल युनीयन ऑफ फॅमिली ऑर्गनायजेशन इ. स.१९९८ च्या परिषदेत मानवी कल्याणासाठी कुटुंबही विश्वव्यापी नातेव्यावस्थीची संघटना आहे.

कुटुंबाच्या बदलत्या परिस्थितीत मुल्यवर्धीत चारित्र्याची जडणघडण व शैक्षणिक संस्काराची गरज आहे. शिक्षणाच्या भरवश्यावरच आज अमेरिका सारखा देश जगाचे नेतृत्व करतो. परंतु कुटुंबाच्या बाबतीत भारतातील संस्कृतीचे अनुकरण करतो. आनंदी जीवनाचे रहस्य शोधण्यासाठी कुटुंबातील संस्कार व प्राचीन मुल्यवर्धीत जडणघडणेची सध्या काळाची गरज आहे. देशाच्या, राज्याच्या, समाजाच्या सर्वांगिण विकासाच्या क्षेत्रात सध्या चांगले बदल होत आहेत. अनेक महत्वपुर्ण निर्णय संस्कृती टिकवीण्याच्या पध्दतीत सत्संग, प्रशिक्षण, योग व प्राणायम शिबीरे, संस्कार केंद्र, मानवी कल्याणकेंद्र, शासकीय योजना, वैज्ञानिक दृष्टी, अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रम,

प्रबोधन व उपकृमाद्वारे सुखी जिवनाच्या गुरुकील्लीचे महत्व हे कुटुंबातील संस्कारापासून सुरु होते. व त्याचा अंत हा सामाजिक संरचना व मानसिक विकृतीतील परिस्थितीशी आधुनिक जीवनशैलीत समावेश होतो. आधुनिक जीवनशैलीत बदलत्या परिस्थितीत कुटुंबाचे व्यवस्थापनातील बदल संस्कृतीकडे घेवून जाणे महत्वाचे आहे. मानवानेच बुध्दीची प्रगती केली. नवनवीन तंत्रज्ञान शोधून काढले. व यंत्राची निर्मिती केली परंतु मानसानेच तयार केलेल्या यंत्रामुळे मानसातील मानूसपण हरवले आहे. नात्यातील स्नेहसंबध संपत आहे. भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्था एक उर्जा आहे. व चेतन शक्तीतील चिरंतन सत्य आहे. तर संस्कृतीतील आदर्श असल्यामुळे समाजात मानवी आचरण हेच देशाचा व समाजाचा विकास आहे. सामाजिक संशोधनात मुलभुत सामाजिक संशोधन क्षेत्रात नव संवेदनशीलतेची गरज आहे.

**२) उद्दिष्टये :**

प्रस्तुत सामाजिक चिंतनात अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१) कुटुंब व्यवस्थेतील संवेदनशीलतेचा अभ्यास करणे.

२) कुटुंबातील आधुनिक जीवनशैली व परिस्थितीचा अभ्यास करणे.

३) बदलत्या नैतिक मुल्यांचा जीवनाकडे पाहण्याचा नव्या दृष्टीकोणांचा अभ्यास करणे.

**३) गृहितके :**

प्रस्तुत शोधनिबंधाचे गृहितक पुढीलप्रमाणे आहेत.

आदर्श कुटुंबातील संस्कार. आधुनिक जीवनशैली व कुटुंबातील भावनिक नातेसंबंध व संवेदनशीलता वैवाहिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक यांचा विकास व सर्व मानवांचा सर्वांगिण अभ्यास करणे.

जीवन प्रणालीतील संस्कार, आदर, भावना यांची नैतिक मुल्यांची घसरण यांच्या महत्वाची जाणीव निर्माण करणे. तसेच मानवी जगण्याची अर्थनिती मानवी मुल्ये सुप्त सामाजिक महापातके आणि मुल्य संवर्धन स्त्रीभुणहत्या इ. पैलुवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**४) संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारीत आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके ,पुस्तके, मासिके, वृत्त पत्रातील लेख इत्यादी माहिती गोळा करुन विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आले आहे.

संकल्पना निश्चित अर्थ विश्लेषणामुळे स्पष्ट होतो.

**५) विश्लेषण :**

समाजशास्त्रीय अध्ययनात ॲरीस्टॉटल हा विचारवंत म्हणतो, Man is social animal माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्याला कुटुंबात आणि समाजात रहायला आवडते. कुटुंबातील

संस्कारापासून ते जगण्याचा संस्कृतीत माणूसकी हे जरी खरे असले तरी समाजात राहताना सामाजिक आरोग्याचे नियम पाळूनच जगावे लागते. हर्बर्ट स्पेन्सर Survival is the fittest समर्थांचे आज्जिवन निसर्गाबरोबर जगण्यास शिकले पाहीजे. निसर्गाच्या विरोधात जगायला शिकला तो संपला. उदा. महाकाय डायनॉसॉर प्राणी मानवाला निसर्गात जगावे लागते समाजात राहतांना नितीमत्ता कशी असावी या संबधी आर्यचाणक्य सांगतात जे नितीनियम समाजाने घालून दिलेले आहेत त्याचे काटेकोर पालन करुन समाजात राहता आले पाहिजे करुन समाजात घालून दिलेले आहेत त्याचे काटेकोर पालन करुन समाजात राहता आले पाहिजे. हे नियम तोडून अव्यावस्थितपणे तुम्ही वागलात तर ते समाजमनाला रुचणार नाही.

मनातील इच्छापूर्ण झाली आहे या समजुतीने मानसचित्रात प्रत्यक्ष त्या इच्छेच्या, समाजाच्या, आरोग्याच्या व कौटुंबिक संस्काराच्या सर्वांगिण आचरणाच्या सानिध्यात रहाणे महत्वाचे आहे. आपली इच्छा पूर्ण व्हायची कोणतीही शक्यता दिसत नाही असं काही होत नसत हे कांही खर नाही मनात येताच पुढच्या ब्रम्हाडात घडणाऱ्या सकारात्मक क्रिया आपोआप थांबतात वैश्विक शक्ती व चिरंतन सत्य तुमची इच्छा पूर्ण करीत असते मात्र नकारात्मकतेमुळे काहीचं घडत नाही तेव्हा स्वतःला तपासा व नकारात्मक दृष्टिकोन ऐवजी वेळ लागला तरी चारित्र्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ऐवजी वेळ लागला तरी चारित्र्यासाठी सकारात्मक सत्यात जगण्याचा प्रयत्न करा यालाच समाजमनातील प्रयत्नातील परमेश्वराचे योगदान म्हणतात.

१) भारतीय कुटुंब व्यवस्था ही जगात सर्वात आदर्श समजली जाते. पाश्चात्य अंधानूकरण, चंगळवाद, व्यसनाधीनता, आर्थिक गतीमानता, वृत्तपत्राद्वारे मोठमोठया जाहीराती, टि.व्ही. विविध साहित्य, बिग बाजार, मॉलच्या भौतिक साधनांमुळे पुढच्या पिढींवर संस्कार करण्यासाठी घरात पणजोबा, आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकू, भाऊ-बहिणी, दादा-वहिनी, मामा-मामी, भाचा-भाची, चुलत, मावस भांवडे इत्यादी पात्र घरात दिसत नाही स्पर्धेच्या युगात आज माणूस एकटा पडला आहे.

२) आधुनिक जीवनशैली व परिस्थितीमुळे जोडीदारात दबाव, तणाव वाढतो, विघटन, घटस्फोट दोघेही नौकरी करत असल्यामुळे जन्माला येणाऱ्या मुलास पालन-पोषण, संगोपन, शिक्षण, आरोग्य, कला-कौशल्य, सुरक्षितता, संस्कार करणारे आजी -आजोबा, काका-काकू नातेवाईक हे लग्न व विघ्न संबधातच दिसून येत आहेत. तरुण पिढी, डींक म्हणजे डबल इन्कम नो किडस् या घातक कल्पना मुळ धरू पाहत आहेत. नौकरी करीयरच्या रॅट रेस मुळे विवाहाचे वय वाढत आहे. तर दुसरीकडे अर्थनितीमूळे घटस्फोटांचे प्रमाण लक्षणीय वाढत आहेत. पाश्चात्यांचे अनुकरण, विभक्त कुटुंबपध्दती वेगवान जीवनशैलीची फलनिश्चीती, संकटे पुढील पिढीत परिणामी नातेसंबधच नष्ट होतात की काय अशी परिस्थिती स्त्रीभ्रुणहत्या

या सामाजिक व मानसिक विकृतीतूनच समाज संरचनात बदलत आहे. कारण सध्याची नविन पिढी ही एक किंवा दोन भावंडाची आहे. एक मूलगा परदेशात असतो आणि एक देशात अशा कुटुंबाच्या व्यवस्थेत समाजात मानसिक विकृतीमुळे स्त्रिभ्रुणहत्याच्या समस्यात मुलगी, कन्या, बहिणी, पत्नी, वहिणी, आक्का, ताई, काकी, मामी, भाची, पुतणी, आत्मीयतेच्या, सुख-दुःखांच्या भावनेचाही ऱ्हास होत आहे. आज चॅटिंग, फेसबुक, व्टिटर, ऑरकुट, मोबाईलच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही संवाद साधल्यामुळे मानसा मानसातील प्रत्यक्ष संवाद कमी होऊ लागला आहे. कुटुंबव्यवस्था ही माणुसकी, माणुसपण, सामाजिक आणि सांस्कृतिक गरज निर्माण झाली आहे.

३) भारतात कुटुंबातील पध्दतीपेक्षा परदेशातही परिस्थिती फारच बदलत आहे. उदा. व्यसनी व्यक्ती आजारी पडली तर, कोणीही नातेवाईक त्यांच्याकडे फिरकत नाहीत. पण आपल्याकडे नवरा व्यसनी असला तरी बायको घटस्फोट घेत नाही. पति हाच परमेश्वर व सातीजन्मी हाच पती मिळू दे म्हणून वट सावित्रीची पूजा करण्याची पध्दत आहे. उत्क्रांतीचा इतिहास बघीतला तर पूर्वीदेखील तो टोळीने राहत होता. त्याचा हळूहळू समाज बनला, कुटुंब बनले त्यातुन नाती निर्माण झाले पण यातही मानसाबरोबर माणूसच होता. उद्या कदाचित काका, मामा, आजी-आजोबा, भाऊ-वहिनी, दादा-वहिनी हे नातेच राहणार नाहीत उदा. इथोपेनीया नावाच्या देशात ५० भारतीय आहेत. ते नातेवाईक नाहीत. पण नेहमी एकत्र येतात मेनू बदलतो पण मानसे तीच आहेत. नातेवाईक नसले तरी मी कोणती माणसे निवडायची हा एकत्र येतात मेनू बदलतो पण माणसे तीच आहेत.

४) पाश्चात्य विचार सरणीचा अवलंब करत असल्यामुळे जीवनशैली सर्वत्र झपाटयाने बदलत आहे. कुटुंबव्यावस्थेत वादाला सुरुवात होते व त्याचे परिणाम घटस्फोटात होते. जोपर्यंत भारतात पुरुष प्रधान संस्कृतीत पुरुषांमध्ये स्त्रीमन निर्माण होणार नाही तो पर्यंत ते स्त्रीला समजून घेणार नाहीत. त्यासाठी सकारात्मक समायोजन व तडजोड हा वैश्विक कुटुंब व्यवस्थेचा आपण विचार आणि स्विकार करायला हवा कुठल्याही बदलाकडे व प्रश्नाकडे आपणं कोणत्या दृष्टिने बघतो ते  बदल कोणत्या पध्दतीने स्विकारले जातात त्यावर कुटुंबव्यवस्था धोक्यात आहे किंवा नाही याबद्दल निष्कर्ष काढता येत नाही हा दृष्टीकोण महत्वाचा आहे.

**६) बदलत्या कुटूंबव्यवस्थेचे जबाबदार घटक :**

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकिय, वैद्यकिय, सांस्कृतिक व विविध कायदे व समाजातील मानसिकता व संरचना जबाबदार आहेत.

१) मानवी वर्तनावर भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थीतीचा प्रभाव.

२) शेती उद्योगाचा पर्यावरणाचा प्रभाव.

३) औद्योगीकरण व नागरीकरण स्थलांतरात धनाचे महत्व.

४) नवीन मूल्यव्यवस्था व आर्थिक स्वातंत्र्य.

५) पाश्चात्य संस्कृती व शिक्षण.

६) स्त्रीयांच्या दर्जातील सुधारणा.

७) स्वार्थी दृष्टीकोण.

८) विवाह विषयक कल्पनांचा प्रभाव.

९) सामाजिक गतीशीलता, विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास.

१०) राज्याचे नवे राजकीय योजना.

११) शासकीय कायदे व एन. जी. ओ. संघटनेचा प्रभाव.

१२) लोकशाहीतील मानव अधिकाराचे महत्व.

**७) उपाय :**

१) विवाह निवडीतील स्वातंत्र्य.

२) व्यक्तीच्या गुणांचा विकास.

३) मर्यादीत जीवन गरजा व स्वार्थ भावनेपासून दूर.

४) मर्यादित संपत्ती.

५) मानसिक प्रवृत्तीत बदल.

६) स्त्रीयांच्या आत्मभावनास जाणीव जागृती.

७) वृध्द, अपंग, विधवा, आजारी यांच्या संबधात सहकार्याची भावना.

८) कुटुंब हाच समाजाचा आधार.

९) कुटुंबाचे भवितव्य आदर्श निर्माण करण्यास अनौपचारीक नियंत्रणाची गरज.

१०) संपत्तीपेक्षा संततीस महत्व.

११) कौटुंबिक कायदे, महिला संघटना आदर्श वृत्तीसाठी समायोजन, सहकार्य तसेच ताणतणाव दुर करण्याची प्रवृत्ती, निर्माणाची जाणीव जागृती.

१२) महिला सक्षमीकरणास प्राधान्य.

१३) आध्यात्म व वैज्ञानिक दृष्टीकोणास महत्व.

**८) निष्कर्ष :**

भारतीय कुटुंब व्यवस्थेत आधुनिक जीवनशैली व बदलत्या प्रवाहाचे लक्षण असले तरी, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक, बौध्दिक व मानसिक स्वरुप बदलले असले तरी भारतीय कुटुंबपध्दतीचे वर्तमान व भविष्य नष्ट झालेले नाही. ही विचार सरणी येथील आदर्शात्मक

मुल्यांचे व चिरंतन सत्याचे प्रतिक आहे. शिकारी अवस्थेतील हे भटके आणि मातृसत्ताक कुटुंब औद्योगिक युगात कुटुंब हे लहान झालेले असले तरी एकाच बळकट धाग्यावर कुटुंबाचे भवितव्य अवलंबून आहे. एकत्र कुटुंब पध्दतीचा उगम पध्दतीचा भारतात असलेली कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत झालेला आहे. हे भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट आहे. मातृसत्ताक कुटुंब पध्दती ही कुटुंब पध्दतीमध्ये वंशावळ ही आईच्या नावाने चालते. आधुनिक काळात या पध्दतीला विशेष महत्व नाही.

भारतातील आदर्श कुटुंब संस्थेचे व भारतीय संस्कृतीचे संपूर्ण जग कौतुक करते आदर्शाचे अनुकरण करते. सामाजिक संशोधनात सत्य शोधण्याची प्रयोगशाळा ही कुटुंबच आहे. जीवनाचे संपुर्ण सुख व समाधानाची गुरुकील्ली हे स्त्रीपुरुषांच्या, सुखाचे, आनंदाचे, समानतेचे व सुसमायोजनेचे आत्म व्यावस्थापन प्राप्त परिस्थितीचे जाण हे एक महत्वपुर्ण योगदान कुटुंबातच आढळते. पुरुषसत्ताकतेतून आलेली शिकवन होती. पण अलीकडे स्त्रीयांना शिक्षण आणि नौकरीच्या संधीतून मिळालेल्या आर्थिक स्वायत्तेतेमुळे सगळी समिकरणे बदलली. बदलत्या जीवनशैलीनुसार पुरुषांच्या मँचोनेसच्या कल्पना बदलत गेल्या. दोघंही कमावते आणि सुशिक्षित असल्यामुळे सहजीवनाच्या राहणीमानाचा पोत, आर्थिक दर्जा सुधारणा सोपं जातंय.

## संदर्भ सूची :-

१) समाजशास्त्राची मुलतत्व - डॉ. मेंहदळे
२) विवाह आणि कौटुंबिक संबध - प्रा. त्रिवेणी फरकाडे, सौ. सुलभा गोंगे
३) स्त्रीपरिवर्तनाची आव्हाने - डॉ. शुभांगी गोटे -गव्हाणे
४) कुटुंब दिवाळी विशेषांक (भुकंप) - संपादक - अशोक चिंचोले २०११
५) मानसशास्त्र वर्तन आणि समायोजन - डॉ. अरुण कुलकर्णी, डॉ. गोरे
६) दैनिक लोकमत, देशोन्नती, सकाळ - २०१०-११, २०११-१२

2020 JETIR February 2020, Volume 7, Issue 2 www.jetir.org (ISSN-2349-5162)

# हुंडा एक सामाजिक समस्या व उपाय योजना"

प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लारे

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

कला व विज्ञान महाविद्यालय,

चौसाळा, ता. जि. बीड.

प्रस्तावना :-

आज भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अनेक वर्षापासून समाज घातक अनिष्ठ अशा प्रथा आणि परंपरा असल्यामुळे त्याचा समाज जीवनावर विपरीत परिणाम होताना आपणास दिसून येत आहे. त्यातील एक समाज घातक प्रथा म्हणून 'हुंडा' या प्रथेकडे पाहता येईल. सर्व समाज व जातीमध्ये किंबा प्रत्येक धर्मात हुंडा दिला जातो आणि घेतला जातो. ही पद्धत अगदी प्राचीन काळापासून भारतात चालत आलेली आहे. वेद उपनिर्षधामध्ये व देवदेवतांच्या आणि राजकुमाराच्या विवादामध्ये सुद्धा मौल्यवान वस्तू भेट दिल्याचे आढळून येते किंवा तसा उल्लेख प्राचीन लिखानामध्ये सापडतो.

आज समाजात हुंडा देणे घेणे ही सामाजिक प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले. कालांतराने वरिष्ठ समाजाकडून कनिष्ठ समाजाकडे ही प्रथा संक्रमित होऊ लागल्याचे आपणास दिसून येत आहे.

संशोधन विधान :- हुंडा एक सामाजिक समस्या आणि बदलता दृष्टिकोण एक समाजशास्त्रीय अभ्यास.

उद्दिष्ट्ये :-

१. हुंडा या अनिष्ठ प्रथेचे स्वरुप समजून घेणे.

२. हुंडयाच्या वाढत्या प्रमाणाचे कारणे व परिणाम यांचा अभ्यास करणे.

३. समाजाचा हुंडयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अभ्यासणे.

४. समाज जीवनावर होणाऱ्या दूष्परिणामांचा सखोल अभ्यास करणे.

५. हुंडा देणार नाही व घेणार नाही या विचाराचा समाज व्यवस्थेत जागर निर्माण करणे.

हुंडा पद्धतीचे सविस्तर विवेचन :-

हुंडा ही एक वधू पक्षाकडून वर पक्षाकडे दिली वा घेतली जाणारी निश्चित स्वरुपाची भेट असून याची पूर्तता नाही झाली तर विवाह विधी पार पडत नाहीत. आज ही प्रथा एक प्रकारे विवाहातील वराची किंमतच ठरवत असून समाजामध्ये आर्थिकदृष्टया गरीब असणाऱ्या कुटुंबातील मुलामुलींच्या विवाहासाठी ही प्रथा जीवघेणी ठरत आहे. त्यामुळे योग्यवेळी योग्य वयात लग्न न होणे, समाजामध्ये व्याभीचाराचे प्रमाण वाढण्याचा संभाव्य धोका होवू शकतो. ऐपत नसताना कर्ज काढून मुलींचे लग्न करणे, पुन्हा कर्जबाजारी होवून अनेक कुटुंब रसातळाला जातात. परिणामी घर, जमीन, सोने, नाणे विकण्याची वेळ त्यांच्यावर येते. विवाहामध्ये ठरलेल्या हुंडयाची वा वस्तू देण्यास विलंब झाला तर मुलीचा अमानुष्य छळ केला जातो. अपमानकारक वागवणे, उपाशी ठेवणे, विनाकारण चारित्र्यावर संशय घेणे, असे प्रसंग काही दोष नसताना मुलीवर सतत येत असतात.

हुंडा या प्रथेमुळे विनाकारण समाजामध्ये मुलींच्या जन्मावरच प्रश्नचिन्ह निर्माण होवून गर्भपातासारखे घृणास्पद कृत्ये समाजामध्ये केले जातात. म्हणजेच मुलीला जन्मापासूनच रोखले जाते. मुलगी जन्माला येणे म्हणजे एक प्रकारे कुटुंबावर संकटच ओढावले असे मानले जाते. मुलगी कुटुंबात जन्म घेणे म्हणजे एक प्रकारे आपत्तीच किंवा पूर्वी जन्मीचे पापच आहे असे समजणे. आज सुद्धा समाज स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणूनच पाहत आला आहे. तसेच ही समाजाची वृत्तीच मूळामध्ये स्त्री-पुरुष समानतेसाठी घातक ठरत आहे. समाज नेहमी स्त्रीला कनिष्ठच मानत आला आहे. समाजात तिचे दुय्यम स्थान असल्यामुळे तिची वेळो वेळी अवहेलना होत आहे.

भारताच्या प्राचीन इतिहासाकडे आपण सूक्ष्मपणे पाहिले तर स्त्रीला मानाचे स्थान होते व स्त्रीमध्ये देवी देवतांचा अंश आहे असे समजून समाज तिची पुजा केली जात असे. पण काळाच्या ओघामध्ये भारतीय स्त्री-जीवनाला दास्यत्व प्राप्त झाले. स्त्रियांचे जीवन विविध समस्यांनी ग्रासले गेले आहे, एकंदरीत आपणाला असे दिसून येते. त्यापैकीच हुंडा ही एक भीषण व स्त्रियांचे जीवन उद्ध्वस्त करणारी सामाजिक समस्या असून तिचे स्वरुप आज दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेले दिसते. सामाजिक प्रतिष्ठा म्हणून ही प्रथा रुढ झाली व आज हीच प्रथा सामाजिक समस्या म्हणून भारतीय समाज व्यवस्थेमध्ये सर्वत्र दिसून येत आहे.

हुंडा पद्धतीची प्रमुख काही कारणे :-

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये हुंडा ही अनिष्ठा प्रथा रुजण्याची आणि झपाटयाने वाढण्याची काही कारणे आहेत. ते अभ्यासणे तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यापैकी काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे–

१. सामाजिक प्रतिष्ठेसाठी :-

हुंडा देणे आणि घेणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असल्यामुळे जास्त हुंडा घेणे किंवा देणे म्हणजे प्रतिष्ठत व कमी हुंडा दिला वा घेतला तर ते कुटुंब कमी प्रतिष्ठीत हा समज सर्वत्र पसरला होता. म्हणजे मोठेपणाची खोटी प्रतिष्ठा हे एक प्रमुख कारण होय.

२. समाज मान्य मार्गाने लौगिंक गरजाची पूर्तता करणे :-

अन्न, वस्त्र व निवारा एवढीच लौगिंक गरजही महत्त्वाची असून या गरजेची पूर्तता करण्यासाठी समाज मान्य मार्ग म्हणजे विवाह अपत्य प्राप्ती होवून वंश वाढवणे कुटुंबाचे व समाजाचे सातत्य टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्यामुळे विवाहाचा हा राजमार्ग अनिवार्य ठरलेला आहे.

३. सामाजिक प्रथा :-

हिंदूच्या धर्मशास्त्रातील विविध उदाहरणावरुन प्रत्येक आई वडिलांनी आपल्या मुलींवरील प्रेमापोटी ठराविक वस्तूंची भेट विवाहप्रसंगी दिले जातात किंवा मौल्यवान दागिणे, अलंकार, संपत्ती विवाहात देण्याच्या पद्धतीमुळे कालांतराने याला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे हे ही एक कारण मानले जात आहे.

४. कुरुप मुली :-

मुलगा गोरा असू किंवा काळा असो पण प्रत्येक मुलाला स्वतःला बायको पाहताना ती सुंदरच असावी अशी अपेक्षा असते. पण या समाजामध्ये कुरुप मुलींचा झालेला जन्म व नंतर कालांतराने आलेले कुरुपत्त्व किंवा व्यंग झाकण्यासाठी अमाप पैशाच्या स्वरुपात हुंडा दिला जातो.

५. वडीलांच्या संपत्तीत मुलींचा वाटा :-

प्रचलित १९५६ च्या हिंदू वारसा हक्काच्या कायद्याने मुलीला तिच्या वडीलांच्या मालमत्तेत मुलाप्रमाणे समान अधिकार व हक्क आहे. त्यामुळे संपत्ती तिच्या नंतर नावे करणे किंवा विवाहाच्या पूर्वीच त्यावर खर्च करणे असा एक विचार समाजामध्ये होता. त्यामुळे हुंडा प्रथेत वाढ झाली असे म्हणता येईल.

६. कर्जबाजारीपणा :-

स्वतःच्या मुलीचा संसार सुखी व्हावा यासाठी चांगली आणि श्रीमंत स्थळे मुलीला यावीत म्हणजे आपोआप धनवान किंवा श्रीमंताच्या घरी मुलगी द्यावी म्हणजे ती सुखात राहिल. हा लोकांचा चंगळ वादाचा समज होता. त्यामुळे स्वतःकडे पैसा नसताना सुद्धा शेती, घर विकून कर्ज काढून विवाह करण्याचे प्रमाण जास्त होते व आजही ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर अशा प्रकारे कर्ज काढून विवाह केले जातात.

७. स्त्री-भ्रूणहत्या :-

मुलगी जन्माला आली म्हणजे हुंडयाची तरतूद करावी लागेल. पुन्हा विवाह वेळी मोठा खर्च होईल अशी धारणा समाजाची होती. त्यामुळे त्या मुलीचा जन्म होण्या आधीच तिची गर्भामध्ये (गर्भपात) करुन हत्या केल्या जात होत्या. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा असून तोच वृद्धपकाळात आपला आधार आहे. मुलगी काय दुसऱ्याच्या घरचा वंश वाढवणार असा एक विचार समाजात प्रचलित होतो.

सामाजिक समस्या बनली. तिचे निर्मूलन होण्यासाठी केवळ कायदे करुन चालणार नाही तर समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. जोपर्यंत यात बदल होणार नाही तो पर्यंत कायदे निष्फळ ठरतील. म्हणून शासन व सेवाभावी संस्थांनी जनजागरण अभियान राबवावे व कायद्याची कायमस्वरुपी कठोर अंमलबजावणी करणे खरोखर गरजेचे आहे असे मला वाटते.

निष्कर्ष :-

१. हुंडा ही प्रथा भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे असे दिसून आले.

२. हुंडयाच्या वाढत्या प्रमाणामुळे हुंडा बळी, स्त्री-भ्रूणहत्त्या, आत्महत्त्या या सारख्या अनेक समस्यांचा जन्म झाला आहे.

३. खज्या अर्थाने २००५ नंतर हुंडयाचे प्रमाण प्रचंड वाढल्याचे दिसून येत आहे.

संदर्भ :-

१. काळदाते सुधाताई (२००५) - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या - विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

२. डॉ. दा.धो. काचोळे (२००५) - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या - विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

३. अशोक गोरे. (२०१५) - भारतीय सामाजिक समस्या - विद्या बुक्स, औरंगाबाद.

४. इंटरनेट, विकीपिडीया, दैनिके, मासिके.

2019 - 20



09

# महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार

प्रा.डॉ. विलास भगवानराव भिल्लारे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**********

**प्रस्तावना :-**

महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील श्रेष्ठ समाजसुधारक आणि धर्मचिंतक होते. आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी परिवर्तनाच्या चळवळीचे ते आद्यप्रर्वतक होते. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकातील समाजसुधारक रानडे, आगरकर, विष्णूशास्त्री पंडीत, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडूरंग इ. अनेक होवून गेले. त्यांची कार्य विशिष्ट काळापुरतीच सिमीत राहिली पण फुले यांचे विचार व कार्य वरील समाजसुधारकाच्या तुलनेत वेगळेच ठरले आहे. महात्मा फुले हे एक कृतीशिल समाजसुधारक होते. त्यांनी मांडलेले विचार हे प्रत्यक्षात आणल्याचे आपणाला दिसून येत आहे. महात्मा फुलें यांचा वारसा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी निष्ठेने चालवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि कबीर यांच्या बरोबरच महात्मा फुले यांना आपले गुरु मानले होते. महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव अनेकांनी केला आहे.

फुले यांच्याबद्दल राजर्षी शाहू महाराज म्हणत, "बहुजन समाजाला अज्ञानातून वर काढून त्याला आर्वाचिन काळी जगविणारे या देशाती पहिले पुरुष ज्योतिराव फुले हे होते."

फुले यांचे पहिले चरित्र्यकार पां. चिं. पाटील यांच्या मते, "महाराष्ट्रात इंग्रज आल्यानंतर जे मोठे पुरुष प्रसिद्धीस आले त्यात महात्मा फुले हे सर्वश्रेष्ठ होत." ग्रामीण भागांमध्ये पारंपारिक पद्धतीने जीवन जगणारा समाज हा शिक्षणाचा गंध नसल्यामुहे दिवसें-दिवस दारिद्र्यात जीवन जगत आहे. हा त्यांचा अंधकार दूर करण्यासाठी शिक्षणा शिवाय पर्याय नाही. म्हणून ते शिक्षणा संदर्भात म्हणतात,

"विद्येविना मति गेली।
मतिविना नीति गेली।
नीतिविना गति गेली।
गतिविना वित्त गेले। वित्तविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।"

केवळ बहुजन समाज हा अशिक्षीत राहिला. त्याचे कारण म्हणजे चातुर्वर्ण व्यवस्था ही होय. त्यावेळी शिक्षणाचा अधिकार शूद्र समाजाला किंवा बहुजन समाजाला नाकारला गेला होता. त्यामुळे ग्रामीण बहुजन समाज शिक्षणापासून कोसो मैल दूर गेला असे आपणाला दिसून येत आहे.

**उद्दिष्ट :-**

१. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांचा परामर्श घेणे.

**झिरपत्या सिद्धांतास विरोध :-**

महात्मा ज्योतिबा फुले यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन हा झिरपत जाणाऱ्या सिद्धांताच्या विरोधात होता. कारण की शिक्षण हे वरच्या वर्गातून खालच्या वर्गाकडे स्वाभाविकपणे झिरपत येईल. असा जो शिक्षण विषयक विचार होता तो महात्मा ज्योतिबा फुले यांना मान्य नव्हता की, अशा पद्धतीच्या शिक्षणामुळे कनिष्ठ वर्गाची हेळसांड होईल असे त्यांना वाटत असे. त्यामुळे कनिष्ठ व शूद्र वर्गातील मुलांसाठी स्वतंत्र्य शाळा काढाव्यात असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**शैक्षणिक विचार :-**

भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांच्या पुणे भेटीवेळी पुण्याच्या सुशोभीकरणावर खर्च होणाऱ्या पैशाला महात्मा फुले यांनी विरोध केला. तो पैसा मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणासाठी खर्च करावा, असे परखड मत त्यांनी मांडले. कारण ते त्यावेळी इ.स. १८७८ ते ८२ या ६ वर्षाच्या काळात महात्मा फुले पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. बहुजन समाजातील मुलाचे केवळ शिक्षण नसल्यामुळेच शुद्रातिशुद्रांचे शोषण होत होते. अज्ञान म्हणजे अंधःकार व ज्ञान म्हणजेच प्रकाश असे महात्मा फुले सतत म्हणत असत. संपूर्ण जीवनाचा कायापालट करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे एक प्रमुख साधन आहे. मानवी हक्क आणि मानवी कर्तव्यांची जाणिव करुन देण्याचे माध्यम म्हणजे शिक्षण होय. महात्मा फुले सतत असे म्हणत की, समाज परिवर्तनाचे व सामर्थ्यांची बीजे शिक्षणात रुजलेली आहेत. विराट राष्ट्र पुरुषास जाग आणण्याचे व त्याला स्वाभिमानाची जाणिव करुन देण्याचे सामर्थ्य शिक्षणात असून शिक्षण हे सर्व सुधारणेंचे मूळ आहे असे ज्योतिराव सतत म्हणत असत.

**स्त्री शिक्षण :-**

पूर्व वैदिक काळात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. परंतु सर्व प्रथम कुटूंब हीच स्त्रियांसाठी शिक्षणाची केंद्रे होती. पुढील काळामध्ये मात्र स्त्री ने शिक्षण घेणे पाप आहे. स्त्री घराबाहेर पडली तर अनर्थ होईल ही चातुर्वर्ण समाजाची व्यवस्था महात्मा फुले यांनी मोडून काढली.

ज्योतिरावांनी मनुस्मृतीला आव्हान देवून अशी घोषणा केली की, "आता तरी तुम्ही मागे घेवू नका। धिःकारुनी टाका मनुमता।। विद्या शिकताच पावाल ते सुख। घ्यावा माझा लेख ज्योती म्हणे।" अशा प्रकारे धर्म मार्तंडाच्या वर्चस्वाला न जुमानता पारंपारिक विचारसरणीची चौकट मोडून समाज परिवर्तनासाठी 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' हा विचार ज्योतिरावांनी आपल्या स्त्री शिक्षण कार्याचा मूलमंत्र मानला.

**स्त्री शिक्षणासंबंधी महात्मा फुले यांचे विचार :-**

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे व अस्पृश्यांच्या शिक्षणाचे असिधाराव्रत हाती घेतले. पुरुषप्रधान व्यवस्था आणि शोषणजन्य दारिद्र्य अशा दुहेरी दुःखात पोळलेली शूद्र स्त्री ही फुले यांच्या विचाराची केंद्रबिंदू होती. स्त्रियांना समाजातील दुय्यम स्थानामुळे नैसर्गिक मानवी अधिकारांना मुकावे लागेल ही जाणिव ज्योतिबांना होती. म्हणून ज्योतिबांनी १८४८ साली पुण्यात बुधवारपेठ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाई स्वतः तिथे शिक्षिकेचे काम करत असत. महात्मा ज्योतिबा फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई यांचे नाव ही आदराने घेतले जात आहे. कारण स्त्री शिक्षणाच्या त्या आद्यक्रांतीकारक होत्या. सावित्रीबाईंना स्वतःचे अपत्य झाले नाही, पण सर्व दीन-दलितांना व अनाथांना जवळ करुन त्यांच्यावर सावित्रीबाईंनी पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम केले. सावित्रीबाईंनी ज्योतिरावांच्या कार्यात उत्तम साथ दिली. सर्व टीका, छळ सहन करुन एका थोर समाजसुधारकाची जीवनसहचारी म्हणून धैर्याने वागून ज्योतिबांचे जीवन धन्य करण्यास त्यांनी सर्वतोपरीने साह्य केले. समाजाच्या अवहेलनेला सावित्रीबाई कधीही डगमगल्या नाहीत. मोठ्या धैर्याने हे पवित्र कार्य त्यांनी चालूच ठेवले.

सावित्रीबाई जवळ विलक्षण चिकाटी व कठोरपणा होता. संत चोखामेळा मंदिरात सावित्रीबाईंनी महार, मांग, कुणबी इ. समाजाच्या मुलींसाठी स्वतः शाळा काढली. त्यांच्या सेवानिवृत्तीने केलेल्या कामाचा गौरव इंग्रज सरकारने पुण्याला विश्रामबाग वाड्यात केला. स्त्री शिक्षकेचा हा पहिला गौरव होता. असा सन्मान आता पर्यंत कोणालाही मिळाला नव्हता.

महात्मा फुले यांनी ज्या समाजपरिवर्तनाची अपेक्षा केली होती त्याचा मूलाधार शिक्षण होय. शिक्षणामुळे आर्थिक विषमता घालविता येऊन सामाजिक समता प्रस्थापित होते. सामाजिक सुधारणेच्या चळवळी जर यशस्वी व्हावयाच्या असतील तर समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींनी शिकून सुसंस्कृत बनले पाहिजे असे महात्मा फुले यांचे मत होते. शिक्षण घेणे हा मानवी हक्क असून त्यास समतावादी विचार आणणे हा खरा धर्म असल्यामुळे त्या प्रमाणे आचरण करणे ही सामाजिक नितीमत्ता होय. असा त्यांच्या शिक्षण विषयक तत्त्वज्ञानाचा सार आहे.

इंग्रज शासनकर्त्यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन व महात्मा फुले यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन यात बरेच व मुलभूत स्वरुपाचे अंतर असल्यामुळे ज्योतिबाचे शैक्षणिक तत्त्वज्ञान इंग्रज शासनकर्त्यांना मानवले नाही. भारतीयांनी पाश्चात्य धर्तीचे इंग्रजी शिक्षण घ्यावे व सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह धरु नये असा इंग्रज शासनकर्त्यांचा विचार होता. उच्चवर्णियांनी इंग्रजी भाषा शिकून ज्ञान लालसा वाढवावी. त्यातूनच त्यांना श्रेष्ठ दर्जाचे पाश्चिमात्य ज्ञान-विज्ञान मिळेल. अशा शिक्षणामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांविषयी व त्यांच्या संस्कृती विषयी आणि सुधारणेविषयी या शिक्षित वर्गाचे अनुकूल मत बनेल व त्यांच्या ठिकाणी शासनकर्त्यांविषयी आदराची भावना बनवेल, असा विश्वास ब्रिटिश शासनकर्त्यांना वाटत होता. काही भारतीय पुढाऱ्यांनेही पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण आपल्या हिताचे आहे, असा विचार सुशिक्षित भारतीय लोकांच्या गळी उतरवला होता व मुख्य उद्देश अशा पद्धतीच्या शिक्षणातून चांगल्या नोकऱ्या मिळविण्याची खात्री होती. या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार करणे किती कठीण काम होते. पण ते कठीण काम ही महात्मा ज्योतिबा फुले यशस्वी करु शकले व शिक्षणातील 'झिरपण्याचा सिद्धांत' विरुद्ध 'शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा सिद्धांत' असा वैचारिक संघर्ष निर्माण करुन भारतातील जनसामान्यांच्या भावी शिक्षणाची मूहर्तमेढ रोवण्याचे ऐतिहासिक कार्य महात्मा फुले यांनी केले आहे.

**हंटर कमिशनला महात्मा फुले यांचे निवेदन :-**

हिंदुस्थानातील शिक्षण विषयक प्रश्नांचा अभ्यास करुन त्या बाबतच्या शिफारशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने इ.स. १८८२ मध्ये सर विल्सम हँटर यांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षण आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाच्या सभासदांनी मोठ मोठ्या शहरांना भेटी दिल्या व सर्व समाजातील बड्या बड्या लोकांच्या मुलाखती घेतल्या, अनेकांची निवेदने स्विकारली. महात्मा फुले यांनी हँटर कमिशनला मुलाखत देवून आपले निवेदन सादर केले होते. या निवेदनातून जे शैक्षणिक विचार स्पष्ट झाले ते खालील प्रमाणे आहेत.

१. प्रारंभी शिक्षण मोफत व सक्तीचे करावे.

२. प्राथमिक शाळेतील शिक्षक हे प्रशिक्षीत असले पाहिजेत. शिक्षक अप्रशिक्षीत असेल तर त्यांचे वेतन कमी असते व त्यांची पात्रताही एकंदरीत बेताचीच असते.

३. प्राथमिक शिक्षक हे शेतकरी वर्गातीलच असले पाहिजेत. ब्राम्हण वर्गातील शिक्षक हे धार्मिक पूर्वग्रहांमुळे कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागतात.

४. जातीपातीच्या पूर्वग्रह दुषित दृष्टिकोनामुळे महार, मांग व इतर कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना काही शाळांमधून प्रवेशच मिळत

नाही व जिथे त्यांची वस्ती आहे तिथे त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा उघडाव्यात.

५. प्राथमिक शाळांच्या संख्येमध्ये सरकारने वाढ करावी.

६. प्रत्येक खेड्यात शूद्रांसाठी सरकारने खास शाळा उघडली पाहिजे.

७. कोणत्याही पातळीवरची शिक्षण व्यवस्था खासगी यंत्रणेकडे असू नये. सर्व पातळीवरच्या शिक्षण यंत्रणा सरकारी यंत्रणाखालील असाव्यात.

अशा प्रकारच्या प्रमुख काही सूचना महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाच्या संदर्भात हंटर कमिशन पुढे मांडल्या होत्या. त्या सूचनांची आज ही काही प्रमाणातत प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमात अंमलबजावणी होत असतांना आपणाला दिसून येत आहे.

**उच्च शिक्षणासंबंधी महात्मा फुले यांचे विचार :-**

महाविद्यालयीन किंवा उच्च शिक्षणाचे स्वरुप कसे असावे, या बाबत महात्मा फुले यांचे विचार पाहणे महत्त्वाचे ठरते. सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरुप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे. त्यावेळी खासगीरितीने बसण्यास मुंबई विद्यापीठाने परवानगी दिली होती. त्याचे स्वागत करुन फुले म्हणतात की, "बी.ए., एम.ए. वगैरे पदवी परीक्षांना खाजगीरित्या परीक्षेस बसण्याची परवानगी दिल्याने ज्ञान प्रसारास मोठ्या प्रमाणावर हातभार लागेल. देशाचे कल्याण होईल व सरकारी खजिन्यावर पडणारा बोजा ही कमी होईल. शाळा, महाविद्यालयातून जेवढे देशी लोक शिकून बाहेर पडतील त्या सर्वांनाच नोकऱ्या मिळणे कठीण असते. म्हणून अभ्यासक्रमात तांत्रिक व व्यवहार उपयोगी शिक्षणाचा अंर्तभाव असावा. स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावर होईल. अशा प्रकारच्या उपाययोजनांना संमती द्यावी." म्हणूनच त्यावेळी महात्मा फुले यांनी हंटर कमिशन पुढे ही शिफारस केल्याचे आपणाला दिसून येत आहे आणि यावरुनच महात्मा फुले यांचा शिक्षण विषयक विचार किंवा दृष्टीकोन आपल्या लक्षात येईल.

**सारांश :-**

शिक्षण हे एक प्रकारे व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन आहे. म्हणून ज्योतिरावांनी शिक्षणाचा आग्रह धरला. समाजातील सर्व थरातील विशेषतः स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणून भारतातील पहिली मुलींची शाळा १८४८ मध्ये पुण्यात सुरु करुन बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी समाजाचा रोष स्विकारुन हे ज्ञानदानाचे पवित्र अशा स्वरुपाचे कार्य सुरुच ठेवले. महात्मा फुले यांचा हाच शिक्षणाचा वारसा आजच्या शिक्षण पद्धती मध्ये सुद्धा मैलाचा दगड ठरला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ सूची :-**


१. प्राचार्य रा.तु. भगत - महात्मा ज्योतिराव फुले ते कर्मवीर भाऊराव - चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर-१९९४.

२. धनंजय किर - महात्मा ज्योतिराव फुले - पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई-२००८.

३. प्राचार्य डॉ.एस.एस. गाठाळ - महाराष्ट्रातील समाजसुधारक - कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद-२०१६.

४. डॉ. मोहन जाधव, प्रा. आरती भोसले, प्रा. प्राची सरपोतदार - भारतीय शिक्षणाचा विकास - फडके प्रकाशन, कोल्हापूर-२००६.

५. प्रा.ना.ग. पवार व अविनाश वरोकर - महात्मा ज्योतिराव फुले - पद्मगंध प्रकाशन, पुणे-२०००.

६. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले - ज्योतिपर्व - स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद-२००४.


❑❑❑